## चित्रपट - सुभद्राहरण

आठवले यांनी होमी वाडिया यांनी निर्मिलेल्या 'सुभद्राहरण' या चित्रासाठी लिहिलेली आणि वसंत पवार आणि प्रभाकर जोग यांनी संगीत दिलेली गीते आजही अत्यंत लोकप्रिय आहेत. 'आला वसंत ऋतु आला', 'उमलली एक नवी भावना' 'कुणाला सांगू माझी व्यथा', एकटी मी एकटी', 'बघत राहू दे तुझ्याकडे' ही सर्वच्या सर्व गाणी श्रवणीय आहेत.

## चित्रपट - सुभद्राहरण

### आला वसंत ऋतु आला

आला वसंत ऋतु आला
वसुंधरेला हसवायाला
सजवित नटवित लावण्याला
आला, आला वसंत ऋतु आला

रसरंगाची करीत पखरण
मधुगंधाची करीत शिंपण
चैतन्याच्या गुंफित माला रसिकराज पातला
वसंत ऋतु आला.

वृक्षलतांचे देह बहरले
फुलाफुलातून अमृत भरले
वनावनातून गाऊ लागल्या पंचमात कोकिळा
वसंत ऋतु आला.

व्याकुळ विरही युवयुवतींना
मधुर काल हा प्रेममिलना
मदनसखा हा शिकवी रसिका शृंगाराची कला
वसंत ऋतु आला.

## चित्रपट - सुभद्राहरण

### उमलली एक नवी भावना

नसे वेगळी सखे तुझ्याहून माझी संवेदना
उमलली एक नवी भावना

अघटीत गेले अवचित होऊन
विसरुनी गेले मी माझेपण
रेशिमधागे गुंतविणाऱ्या प्रीतीच्या या खुणा
उमलली एक नवी भावना

वसुंधरेच्या कणाकणातून
आकाशाच्या अणुरेणूतून
एक आगळी रसरसलेली प्रकटे नवचेतना
उमलली एक नवी भावना

हात असावे असेच हाती
अचल ध्रुवापरी अपुली प्रीती
मुक्ती नको मज प्रीतीसाठी जन्म पाहिजे पुन्हा
उमलली एक नवी भावना

## चित्रपट - सुभद्राहरण

### कुणाला सांगू माझी व्यथा

प्राजक्ताच्या प्रासादावर पडली विदुल्लता
कुणाला सांगू माझी व्यथा

प्रलयाचे हे भीषण तांडव
डळमळला गगनाचा मांडव
थरथरत्या पृथ्वीवर नाचे तिमिरदैत्य एकटा
कुणाला सांगू माझी व्यथा

कशास जडल्या अपुल्या भेटी
कशास जडली वेडी प्रीती
मीलन अपुले ठरले आता स्वप्नामधली कथा
कुणाला सांगू माझी व्यथा

कोण निवारील घोर अनर्था
तूच प्राण तू जीवन पार्था
ये विझवाया हा दावानल शिंपाया अमृता
कुणाला सांगू माझी व्यथा

## चित्रपट - सुभद्राहरण

### एकटी मी एकटी

संचिताचे खेळ सारे दुष्ट दैवाची गती
एकटी मी एकटी

शांतवू केवी मनाला
हाक मी मारू कुणाला
भाग्य होता पाठमोरे आप्तबंधू पांगती
एकटी मी एकटी

भंग झाला भावनांचा
रंग गेला जीवनाचा
हास्य लोपे लोचनांचे अश्रुधारा वाहती
एकटी मी एकटी

आग पेटे भोवताली
स्वप्नपुष्पे दग्ध झाली
मृत्युही होई न माझा सोबती या संकटी
एकटी मी एकटी

## चित्रपट - सुभद्राहरण

### बघत राहू दे तुझ्याकडे

आज अकल्पित भेट घडे, भेट घडे
बघत राहू दे तुझ्याकडे

दु:ख न उरले सरली भीती
अंगान्गातून भरली प्रीती
धुंद गंध हा चहुकडे, चहुकडे
बघत राहू दे तुझ्याकडे

गीत स्फुरे कंठातून कोमल
पंखांना ये आज नवे बळ
उल्लन्घाया उंच कडे, उंच कडे
बघत राहू दे तुझ्याकडे

सत्य भेटले सौंदर्याला
अंकुर फुटले माधुर्याला
हर्षसागरी गगन बुडे, गगन बुडे
बघत राहू दे तुझ्याकडे